# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/08/2023 (गुरूवार) दुपार


---

### चोरी

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मेतकर ले आउट नरखेड येथे दिनांक ०२/०६/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान **आरोपी नामे– १) गौतम मुलताईकर, रा. नरखेड २) राजेश युवनाती, रा. परसोडी दिक्षीत ता. नरखेड** हे फिर्यादी नामे– भिमसेन एकनाथ बागडे, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ११ नरखेड यांच्या गोडाउन मध्ये कामाला होते. दिनांक ०२/०८/२०२३ चे दोन महीन्या पुर्वी मुद्देमाल चोरून नेल्याचे समजले. चोरी गेलेल्या मालाचे वर्णन असे की, ७२ पिस बोर्न विटा, १०० पिस कॅटबरी चॉकलेट, २४ पिस लक्टोजन, १२ पिस नॉन लक्टोजन, २४ पिस पॅरासुट आईल, ६० पिस सुहाना मसाले, ७२ पिस नंबरवन साबन बंडल, १२ पिस टोमॅटो केचअप, १० किलो अंबारी मिरची पावडर, ६ पिस बॉडी स्प्रे व इतर असा एकुण ७०,०००/–रूपयाचा मुद्देमाल दोन्ही आरोपीतांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८१, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ/१५९८ शैलेश डोंगरदिवे पोस्टे नरखेड मो. क्र. ७०५७४०१५९८ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. रामटेक** :– दिनांक ०१/०१/२०२२ ते दिनांक ३०/१२/२०२२ चे १०:०० वा. ते २३:५५ वा. पर्यंत यातील पिडीत फिर्यादी वय १८ वर्षे, ०५ दिवस ही तिचे आई, वडिल व लहाण भाऊ, बहीणीसह राहत असुन तिचे वर्ग १० वी चे शिक्षण तिचे दोन्ही हात व खांदा फॅक्चर झाल्याने तिने पुढील शिक्षण सोडुन दिले असुन ति सध्या घरीच राहते. मार्च २०१८ मध्ये ति कपडे वाळवत असतांना ईलेक्ट्रीकचे खांबावर पडल्याने तिला दोन्ही हाताला व खांदयाला मार लागुन दोन्ही हात फॅक्चर झाले होते तेंव्हा तिचा रामटेक येथील पाठक मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल येथे उपचार घेतला होता. त्या दरम्यान फिर्यादीचे आई वडिलांनी तिला गावठी झाडपत्तिचे औषध देण्याकरिता महादुला येथील मनोहर सखाराम काठोके वय ६३ वर्ष, रा. महादुला ता. रामटेक यांना सांगीतले होते. तेंव्हा मनोहर काठोके हा डिसेंबर २०१९ पासुन रोज सकाळी १०/०० वाजता पिडीतेच्या घरी येवुन तिला झाडपत्तीचा लेप लावुन दुपारी ०२/०० वाजता लेप लावुन झाल्यावर घरी निघुन जात होता. झाडपत्तिचे औषधाने पिडीतेला आराम पडत असल्याने तिचा उपचार सुरूच होता. जानेवारी २०२२ मध्ये पिडीतेचे आई वडिल नेहमी प्रमाणे सकाळी ०९:०० वाजता कामाला गेले होते तिचे भाऊ व बहीण शाळेत गेले होते त्यादरम्यान मनोहर काठोके हा लेप लावण्या करिता घरी आला त्याने पिडीतेचे हाताला लेप लावला व तिला माझे तुझावर प्रेम आहे असे म्हणुन तिची इच्छा नसतांना तिचेवर बलात्कार केला तिचे दोन्ही हात फॅक्चर असल्याने व तिचे हाताला लेप असल्याने ति त्याला विरोध करू शकली नाही ति जोरात ओरडत असता तिचे तोंड दाबुन तु कोणाला सांगशील तर तुला जिवाने मारून ठाकीन अशी धमकी दिली. व तिची इच्छा नसतांना तिचे सोबत वारंवार शारिरिक संबंध करित होता. पिडीतेने भितीमुळे कोणालाच काही सांगत नव्हती. मनोहर काठौके हा नेहमी तिचे घरी येत होता व लेप लावुन तिचेवर शारिरिक संबध करित होता तारीख ०९ ऑगस्ट २०२३ रोजी तिचे पोटात दुखत असल्याने व तिचे घरी कोणी हजर नसल्याने तिने मनोहर काठोके याला सांगीतले

वरून त्याने फिर्यादीला उपचारा करिता रिहान दवाखाना रामटेक येथे नेले असता ती ७ महीण्याची गर्भवती असल्याचे सांगीतले वरून त्याने पिडीतेला दुसऱ्या दिवशी वात्सल्य हॉस्पीटल रामटेक येथे नेले असता तिची दि. ११/०८/२०२३ रोजी डिलीव्हरी झाल्याने तिला एक मुलगी झाली आहे. यातील फिर्यादी पिडीत मुलीसोबत आरोपी मनोहर काठौके रा. महादुला रामटेक याने तिचे इच्छे विरूध्द वारंवार शारिरिक संबध केल्याने तिला गर्भवती करून पिडीतेने मुलीला जन्म दिला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२)(N), ५०६ भा.दं.वि. बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४, ५(एल), ५(जे) (२), ६, ८, १२ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक स्वाती यावले मॅडम पोस्टे रामटेक या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर